आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
रविवार दिनांक १२ ऑक्टोबर २०२५

<u>ठळक बातम्या</u>

1. न्याय पक्षकाराच्या दारात पोहचण्याच्या दृष्टीने मंडणगडचं न्यायालय महत्त्वाचं ठरणार असल्याचं सरन्यायाधीश भूषण गवई यांचं प्रतिपादन.

2. नागपूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2025 साठी आरक्षण सोडत उद्या जाहीर होणार.

3. नागपूर महानगरपालिकेच्या वतीने ५ नव्या ई-वाचनालयांसाठी ३२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद.

4. १०व्या खासदार सांस्कृतिक महोत्सवाचं 7 ते 18 नोव्हेंबर दरम्यान आयोजन; देशभरातील कलाकार होणार सहभागी.

<u>मंडणगड न्यायालय</u>

सामाजिक आणि आर्थिक लोकशाही नसेल, तर राजकीय लोकशाहीचा उपयोग होत नाही, असं डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. न्याय पक्षकाराच्या, शेवटच्या घटकाच्या दारात पोहोचला पाहिजे आणि त्या दृष्टीन मंडणगडचं हे न्यायालय महत्त्वाचं ठरणार आहे,' असं प्रतिपादन देशाचे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केलं. मंडणगडच्या दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते आज झालं. त्यानंतरच्या सभेत ते बोलत होते.

*सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण होणार नाही तोपर्यंत राजकीय लोकशाही काही अर्थाची नाही, अस 25 नोव्हेंबर 1949 रोजीच्या भाषणात बाबासाहेबांनी म्हटलेलं होतं आणि आपण जे इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करतो, ठिकठिकाणी न्यायालय उभे करतो राहायला उभा करतो It is one of the ways of the justice reaching to the doorsteps of the litigant. न्याय हा पक्षकाराच्या दारात पोहोचला पाहिजे. आणि म्हणून डीसेंट्रलायझेशनला मान्य करतो, ठिकठिकाणी न्यायालय उभारणी करतो.*

सरन्यायाधीश गवई यांनी न्यायालयाच्या प्रांगणात उभारलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरणही केलं. हे डॉ.आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा असलेलं देशातलं एकमेव न्यायालय ठरलं आहे. डॉ. आंबेडकरांच्या जीवनातल्या काही प्रसंगांची शिल्पंही इथे साकारण्यात आली आहे.मंडणगडचं नवं न्यायालय हे सुमारे

चार ते साडेचार लाख लोकांना मध्यवर्ती पडेल, त्यामुळे त्यांचा प्रवास आणि पैसे वाचतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

*हे न्यायालय याकरता महत्त्वाचे आहे की आज आपण विचार केला तर रत्नागिरी जवळपास 150 किलोमीटर आहे, जवळपास चार साडेचार लाख लोकांना हे न्यायालय मध्यवर्ती पडणार आहे. त्याच्यामुळे लोकांचा जो काही प्रवास आहे तो प्रवास हा मोठ्या प्रमाणात वाचणार आहेत. लोकांचे पैसे त्याच्यामध्ये वाचणार आहे, त्याची गती देखील मोठ्या प्रमाणात वाढणार आहे, आणि म्हणूनच मला असं वाटतं की केवळ एक इमारत किंवा एक न्यायालय नाही, तर लोकांकरता न्यायदानाची व्यवस्था, एक गतिशील व्यवस्था या निमित्ताने तयार झालेली आहे.*

राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचं मूळगाव ज्या मंडणगड तालुक्यात आहे, तिथं न्यायालय उभं राहणं, हा बाबासाहेबांच्या वारशाचा गौरव असल्याचं मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्रीचंद्रशेखर यांनी म्हंटलं.

<u>ब्लू फ्लॅग मानांकन</u>

महाराष्ट्रातल्या पाच समुद्र किनाऱ्यांना आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन प्रमाणपत्र मिळालं आहे. या यादीत रायगड जिल्ह्यातल्या श्रीवर्धन आणि नागावसह, पालघरमधल्या पर्णका, तसंच रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागर आणि लाडघर या किनाऱ्यांचा समावेश आहे. महिला आणि बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती जाहीर केली. जागतिक स्तरावर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक समुद्र किनाऱ्यांना डेन्मार्कच्या फाऊंडेशन फॉर एन्व्हायरन्मेंटल एज्युकेशन संस्थेकडून ३३ निकषांच्या मूल्यमापनातून हे मानांकन दिलं जातं.

<u>आरक्षण सोडत</u>

नागपूर जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक 2025 च्या अनुषंगान नागपूर जिल्हा परिषद विभागाच्या सदस्यांचा आरक्षण सोडत कार्यक्रम उद्या दुपारी एक वाजता नागपूरच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील बचत भवन सभागृहात होणार आहे. त्याचप्रमाणे नागपूर जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या एकूण 13 पंचायत समितीतील निर्वाचक सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देखील उद्या एक वाजता संबंधित तालुका मुख्यालयात आयोजित करण्यात आला आहे. या अनुषंगान जिल्ह्यातील सर्व

नागरिकांना उपस्थित राहण्याचं आवाहन जिल्हाधिकारी डॉक्टर विपिन इटनकर यांनी केलं आहे.

अंडा भुर्जी विक्रम

अंड्यांबद्दल असलेल्या गैरसमजांना दूर करून, समाजात त्यांच्या पौष्टिक मूल्यांविषयी जनजागृती करण्यासाठी आज सकाळी जागतिक अंडी दीनाच औचित्य साधून शेफ विष्णू मनोहर यांनी तब्बल ५००१ अंड्यांची भुर्जी तयार करत विश्व विक्रम केला. महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ (माफसू), अंतर्गत नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाच्या कुक्कुट पालन शास्त्र विभागान शेफ विष्णू मनोहर यांच्या सहकार्यान हा आगळावेगळा उपक्रम राबविला. आज पहाटे साडेपाच वाजता सेमीनरी हिल्स परिसरातील पशुवैद्यक महाविद्यालयाच्या आवारात या उपक्रमाचं उद्घाटन करण्यात आलं. भुर्जी तयार करण्याची प्रक्रिया सकाळी नऊ वाजेपर्यंत चालली. हजारोच्या संख्येन जमलेल नागरिक यावेळी भुर्जीची चव घेत विश्वविक्रमाचे साक्षीदार बनले.

बिल्डथॉन

विकसित भारत बिल्डथॉन राष्ट्रीय स्पर्धा उद्या आयोजित करण्यात आली आहे. देशभरात शालेय विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष -रचनात्मकतेला प्रोत्साहन देण्यासह स्वदेशी, आत्म निर्भर भारत, व्होकल फॉर लोकल आणि समृद्ध भारत या संकल्पनांवर आधारित ही अभिनव स्पर्धा आहे. यात लाईव्ह स्ट्रीमिंगद्वारे देशभरातील शाळांमधील विद्यार्थांचे संघ आपल्या विशेष प्रकल्पांसह संबंधीत कार्यक्रमात ऑनलाईन पध्दतीनं सहभागी होतील.

चांदीचा भाव

बुलढाणा जिल्ह्यात चांदी खरेदीसाठी प्रसिद्ध असलेल्या खामगाव शहरात गेल्या २ दिवसांत चांदीचा भाव ३० हजारांनी वधारला आहे. चांदी खरेदीची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली असून आता १ किलो चांदी खरेदीसाठी ग्राहकांना १ लाख ७२ हजार रुपये मोजावे लागत आहेत.

मनपा वाचनालय

शहरातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी नागपूर महानगरपालिकेच्या वतीन जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ५ नव्या ई-वाचनालयाच कार्य सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या काळात नव्यान सुरु होणारी ई - वाचनालय या विविध परीक्षांची तयारी करणाऱ्यासाठी आशेचा किरण ठरणार आहे. याकरिता एकूण ३२ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मनपातर्फे

सध्या ९ ई- वाचनालय संचालित होत आहेत. यामध्ये ३ स्मार्ट सिटी ई- वाचनालय, मनपा कर्मचारी द्वारा संचालित ४ आणि स्वयंसेवी संस्था/महिला बचत गटाद्वारे संचालित २ वाचनालय आहेत. याशिवाय शहरात एकूण २९ वाचनालय आहेत.

<u>खासदार सांस्कृतिक महोत्सव</u>

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून, सांस्कृतिक मूल्यांचे जतन आणि परंपरेचा वारसा पुढे नेण्यासाठी आयोजित 'खासदार सांस्कृतिक महोत्सव – 2025' च यंदाच 10 व वर्ष असून हा महोत्सव येत्या, 7 ते 18 नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात येणार असल्याची घोषणा खासदार सांस्कृतिक महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष तसच राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या पटांगणात बावनकुळे यांच्या हस्ते महोत्सव स्थळाचं भूमिपूजन करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते. यंदा महोत्सवाच 10 व पर्व असून देशभरातील हजारो कलाकार या सांस्कृतिक पर्वात सहभागी होणार आहेत. नागपूर, महाराष्ट्र आणि देशाला भेट ठरणारा हा महोत्सव सर्व नागपूरकरांसाठी आनंदाचा सोहळा ठरेल, अशी भावना यावेळी त्यांनी व्यक्त केली.

<u>नारायण सुर्वे विशेष पुरस्कार</u>

कविवर्य नारायण सुर्वे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नागपूरचे बालकवी आणि कार्यकर्ते प्रसेनजित गायकवाड यांच्या 'काय तसे मी करू?' या बालकविता संग्रहाला नारायण सुर्वे विशेष पुरस्कार जाहीर झाला आहे. नाशिक मध्ये १५ ऑक्टोबरला होणाऱ्या नारायण सुर्वे साहित्य संमेलनात गायकवाड यांना हा पुरस्कार देऊन सन्मान केला जाईल. कविवर्य नारायण सुर्वे सार्वजनिक वाचनालयातर्फे हे साहित्य संमेलन होत आहे.

<u>'पालकमंत्री रोजगार मेळावा 2.0'</u>

जिल्ह्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी पालकमंत्री रोजगार मेळाव्याचे आयोजन सुरु आहे. जास्तीत-जास्त युवक-युवतींना रोजगार उपलब्ध होण्यासाठी दर महिन्याला हा उपक्रम आयोजित करण्याच्या सूचना आज महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या. त्यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आली. श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी तथा युवा फाउंडेशन आणि नॅशनल रिअल इस्टेट काउन्सिल विदर्भच्या वतीने महालक्ष्मी जगदंबा संस्थान कोराडी इथं 'पालकमंत्री रोजगार मेळावा 2.0' चं आयोजन करण्यात आलं. त्यावेळी चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते.

## भारत विरुद्ध वेस्ट इंडिज कसोटी

भारत आणि वेस्ट इंडिज दरम्यान नवी दिल्लीत सुरू असलेल्या दुसऱ्या क्रिकेट कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजवर फॉलोऑनची नामुष्की आली. कुलदीप यादव याच्या भेदक माऱ्यामुळे वेस्ट इंडिजला पहिल्या डावात फक्त २४८ धावा करता आल्या. तर भारतानं पाच गड्यांच्या मोबदल्यात ५१८ धावांवर डाव घोषित केला. तिसऱ्या दिवशी वेस्ट इंडिजच्या फलंदाजांनी कालच्या चार गडी बाद १४० या धावसंख्येवरून खेळायला सुरुवात केली. दिवसाअखेर वेस्ट इंडिजच्या 2 बाद 173 धावा झाल्या आहेत.

## भारत विरुद्ध ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट

आयसीसी महिला एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना ऑस्ट्रेलिया बरोबर सुरु आहे. विशाखापट्टणम इथं भारतीय वेळेनुसार दुपारी ३ वाजता हा सामना सुरू झाला. ऑस्ट्रेलियन संघान नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतीय संघाच्या 45 षटकांत 6 गडी बाद 310 धावा झाल्या आहेत.

******